६ शुक्रवार दि. २६ सप्टेंबर २०१४

दै. सागर
रायगड

# सुधागडच्या ग्रामीण भागातील महिलांनी बनविलेल्या खाकरे व अन्य उत्पादनांना देशभर मागणी

## श्रमिक नारी संघातर्फे सुरू झालेल्या व्यवसायाचे महिला गृह उद्योगात रूपांतर




श्रीमद राजचंद्र आत्मतत्व रिसर्च सेंटर परळी येथे श्रमिक नारी संघाच्यावतीने सुरु झालेल्या महिला गृह उद्योगाचे उद्घाटन प. पू. प्रविण मेहता यांच्या उपस्थितीत उद्योगपती बिपीन बावीसी व निशा बावीसी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी निलेश मेहता व नानलालभाई शहा उपस्थित होते. **(छाया : शरद निकुंभ, पाली)**

**पाली (शरद निकुंभ) :-** सुधागड तालुक्यात परळी घोटावडे येथे दहा वर्षापूर्वी श्रीमद राजचंद्र आत्मतत्व रिसर्च सेंटर प. पू. प्रविण मेहता यांच्या प्रेरणेने सुरू झाले. स्वत:ची परिपूर्ती आत्मज्ञानाने कशी प्राप्त करून घेता येते याचे संशोधन व साध्य असा या आश्रमामागील हेतु होता. याबरोबरच ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी त्यांना काम उपलब्ध करून देण्याच्या कल्पनेतून श्रमिक नारी संघाची स्थापना करण्यात आली होती. सुरूवातीस दोन महिलांच्या माध्यमातून गुजराथी आहारातील खाकरा पदार्थ बनविण्याच्या कामास सुरूवात झाली. आज या व्यवसायाचे रूपांतर महिला गृह उद्योगात होत आहे याचा आनंद सर्वांना होत आहे, असे प्रतिपादन श्रमिक नारी संघाच्या संचालिका सिमी थापर यांनी केले.

महिला गृह उद्योगाचे उद्घाटन प.पू.पप्पाजींच्या प्रमुख उपस्थितीत उद्योगपती बीपीन बाविसी व निशा बाविसी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्रमिक नारी उद्योग समूहाच्या संचालिका सिमी थापर, मिता हेमाणी, पुनिता अजमेरा, शिल्पा शहा, श्रुती शेठ, प्राणलाल शहा, बीनीन सावला या मान्यवरांसह आश्रमाचे अनेक मुमुक्षु यावेळी उपस्थित होते. महिला गृह उद्योगाच्या उत्पादनांचे ब्रॅन्ड नेम चाक्रि असे ठेवण्यात आले आहे. चाक्रि म्हणजे सेवा असा अर्थ होतो. या उद्योगात दिवाळीकरिता लागणारे विविध दिवे, सुकामेवा पॅकिंग, चॉकलेट पॅकिंग आणि विविध चवीचे खाकरे असे उत्पादन महिला उद्योगात घेतले जात आहे. आज सुमारे पन्नास महिला या उद्योगात श्रमिक नारी संघाच्या वतीने काम करीत आहे.

ग्रामीण भागातील अशिक्षित महिलांना काम शिकवून त्यांना रोजगाराची संधी आणि आर्थिक विकास घडवून आणण्यासाठीचा प्रयत्न श्रीमद राजचंद्र आत्मतत्व रिसर्च सेंटर च्या माध्यमातून केला जात आहे.